



# ज्योती



ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

(ईशान्य ओहायो मराठी मंडळ) १ जानेवारी २००३ : वर्षारंभ विशेषांक : वर्ष २७ अंक १ (Northeast Ohio Marathi Mandal)

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ


## कार्यकारिणी २००३

अध्यक्ष– चेतन अमीन
४४०–९४६–२७१८

उपाध्यक्षा– ज्योती हरवाळकर
४४०–३४७–०६५३

सचिव– आदेश दर्यापूरकर
४४०–८७८–३७६०

खजिनदार– समीर देशपांडे
४४०–७७७–९५२५

सांस्कृतिक कार्यवाह–
शुभांगी पै
४४०–७३४–१८३०
श्रीकांत लिमये
४४०–७७९–१६३२

स्पेशल टास्क फोर्स – अच्चुत मालुर
४४०–५८५–९९९४

## ज्योती संपादक मंडळ २००३

**संपादिका –** अश्विनि दर्यापूरकर
दीपा देशपांडे

**मुद्रक व वितरक–** चेतन अमीन
ज्योती हरवाळकर

## Advertisement Rates

per bimonthly issue

Qrtr Page: $25
Half Page: $50
Full Page: $75

Discounts: 10% for 2 issues, 20% for 3 issues, 25% for 4 issues. Set-up fee $15 if reqd.
All rates for the Diwali issue are double.
All payments MUST be received in advance.


## Marathi Mandal Gets "First Lady"………

२००२ चा मराठी मंडळाचा दीपावली महोत्सव 'नेहमीच्याच' थाटामाटात साजरा झाला. कुठल्याही 'प्रगत' लोकशाहीभिमान राज्याप्रमाणेच याही कार्यक्रमात जेमतेम ४० टक्के लोकसंख्येने मतदानासाठी उपस्थिती लावली. ईतरांनी आपला अलिप्ततावादाचा हक्क बजावला. ९ नोव्हेंबर या दिवशी मात्र अध्यक्षपदाची धुरा सांभाळायचा एकमेकांना 'गोड' आग्रह करतच मंडळी आपापल्या "ब्याकयार्डात' परतली. त्यानंतर मात्र पडद्याआड हालचाली सुरू झाल्या, आणि ७ डिसेंबर ला २००२ ची कार्यकारिणी आणि विश्वस्तांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत श्री. चेतन अमीन यांनी भावी अध्यक्षपदाची सूत्रं हाती घेतली. आता १ जानेवारीपासून 'नवा भिडू, नवी विटी, आणि नवं राज्य'. पराग कानविंदे, आणि विजय हरवाळकर अश्या एकल्या जीवांनंतर, आज दोन वर्षांनी मराठी मंडळाला अनिता अमीनच्या रूपाने 'First Lady' प्राप्त झाली आहे. वाजपेयी–कलाम यांच्या 'single' कारकीर्दीतल्या भारतवर्षालाही अशी 'First Lady' लवकरच लाभो.

चेतन आपली कार्यकारिणी एकत्र करतोच आहे. ती घडी व्यवस्थित बसेपर्यंत नव्या अध्यक्षांनी २००३च्या पहिल्या ज्योतीसाठी मदतीची हाक मारलीय. म्हणून हा 'पुन्हा प्रपंच". नव्या कार्यकारिणीची माहिती नेहमीच्या रकान्यामध्ये आहेच. शिवाय ज्योतीचे सर्व अंक नव्या वेबसाईटवर प्रसिद्ध होतातच आहेत. हे नवीन वर्ष आपणां सर्वांना सुखाचे व समृद्धीचे जावो ही गणेशचरणी प्रार्थना!

## वदले अध्यक्ष

प्रिय मित्रांनो,

हे नववर्ष आपणास व आपल्या प्रियजनास सुखासमाधानाचे व समृद्धिचे जावो. सर्वप्रथम मी २००२ च्या कार्यकारिणीच्या कामाची प्रशंसा करून त्यांचे आभार मानतो आणि अशीच परंपरा पुढे चालू ठेवण्याचा संकल्प करतो. या साठी आपल्या सहकार्याची आणि आशिर्वादाची अपेक्षा करतो.

The mission of Marathi Mandal is to provide a platform for Marathi related people to network with each other and celebrate functions and activities. To achieve this mission and to grow, it is important that all of the members participate and support this mission financially and by participation.

## मराठी मंडळाचे कार्यक्रम
## आगामी कार्यक्रम

जानेवारी २५: मकर संक्रांत/ प्रजासत्ताक दिन

मार्च २२: होळीपौर्णिमा
सहल
नारळीपौर्णिमा
गणेशोत्सव
दीपावली

**कार्यक्रम:** मकर संक्रांत । भारतीय प्रजासत्ताक दिन

**दिवस:** जानेवारी २५, २००३
**वेळ:** सायंकाळी ४:०० वा

**स्थान:** शिव विष्णु मंदिर

**प्रवेश शुल्क:** विनामूल्य

## ज्योतीसाठी साहित्य

गावातील लेखक–कवी मंडळींकडून *ज्योती*मध्ये प्रसिद्धिसाहित्याची आवश्यकता आहे. आपले लेख, कथा, कविता, *ईनोद;* दर सम महिन्याच्या (फ्रेबु., एप्रिल, जून, इ.) १५ तारखेपर्यंत इलेक्ट्रॉनिक माध्यमा तून पाठवावे. मराठी टायपिंगची सोय हस्त लिखित पानी $१० दराने उपलब्ध आहे.

आपल्या सोईसाठी या वर्षी आम्ही काही नवीन योजना पुढे आणत आहोत. त्याची माहिती आपल्याला या व पुढील अंकात मिळेलच. (For this reason we have come up with some new concepts. This information will be provided in this as well as coming issues.)

या वर्षीच्या कार्यक्रमाची सुरुवाअत गोड बोलून करुया – संक्रांतीच्या कार्यक्रमाला भेटुया!

जय हिंद,

चेतन अमीन, अध्यक्ष २००३

## तिळगूळ घ्या...

मराठी मंडळाच्या सभासद तसेच सभासद नसलेल्या सर्वां साठी आणि त्यांच्या कुटुंबियां साठी हे “मकर संक्रांत । भारतीय प्रजासत्ताक दिन सोहळा” कार्यक्रमाचे निमंत्रण आहे. कार्यक्रम दिनांक २५ जानेवारीला सायंकाळी ४:०० वाजता शिवा विष्णु मंदिरा मधे होईल.

या वेळी आपण सहभोजनाचा (पॉटलक पार्टी) बेत ठरविला आहे. आणायच्या पदार्थांच्या संयोजना साठी कृपया ज्योति हारवाळकरांशी संपर्क साधावा. स्त्रियांनी येताना प्रत्येकी ३ डॉलर्स पर्यंतची एक भेट वस्तु आणावी. सर्व वस्तु गोळा करून नंतर हळदी कुंकवाच्या कार्य क्रमात वाटल्या जातील.

| शायंकाळी | कार्यक्रम |
|---|---|
| ४:०० ते ५:०० | नोंदणी । स्वागत |
| ५:०० ते ५:२० | राष्ट्रगीत, कार्यकारी समितीची ओळख |
| ५:२० ते ५:३० | मकर संक्रांतीचे महत्त्व |
| ५:३० ते ६:०० | बोर नहाण (मुले) |
| ६:०० ते ६:३० | पिनाटा |
| ६:३० ते ७:३० | भोजन |
| ७:३० ते ८:०० | हळदी कुंकु । वाण (स्त्रियां साठी) |

कार्यक्रमा विषयी प्रश्न असतील तर कृपया चेतन अमीन यांच्याशी संपर्क साधावा. कार्यक्रमात सहभागी होण्या साठी प्रवेश शुल्क नाही.

## उजळूया लक्ष दिवे...

ज्योतीच्या वार्ताहरांकडून (मिलिंद कंटक)

"आजच्या दिवाळी कार्यक्रमाची तिकीट घेतलेल्यांनी सभागृहामागच्या बंद जिमखान्यात जमावे" मंडळाचे कार्यकर्ते, अजित जोशींनी आपल्या खणखणीत आवाजात घोषणा केली. मंडळाचा दिवाळी कार्यक्रम जिमखान्यात??? जमलेल्यांना मोठा प्रश्न पडला. कोणी जागेवरून हलायलाच तयार नव्हते. जे कोणी धीर करून जिमखान्यात शिरले होते ते परतून बाहेर येत नव्हते. मंडळी भरजरी कपडे घालून दिवाळी सण साजरा करायला आले होते. जिमखान्यात जोशीसर उडया मारायला आणि "सावधान–विश्राम" कवायत करायला लावतात की काय याचीच सर्वांना भीती. शेवटी मनाचा हिय्या करून ज्योतीचे वार्ताहर जिमखान्यात शिरले आणि समोरचे दृश्य आ वासून पहातच राहीले. जिमखान्याच्या एका भिंतीजवळ दोन मोठी टेबलं मांडून त्यावर दिवाळी फराळ ठेवला होता. जोशीसर देखील एका गालात बुंदीचा आणि दुसऱ्या गालात रव्याचा लाडू कोंबून बोलायचा प्रयत्न करत होते.

हे सर्व पहाताच वार्ताहरांनी बाहेरच्या लोकांना निःसंकोच आत येण्याचा इशारा केला. जिमखान्यात कवायत वगैरे काही नसून दिवाळी फराळाची व्यवस्था केली आहे ही बातमी संपूर्ण सभागृहात पसरली. जिमखान्यात लख्ख प्रकाश असूनही मंडळाचे एक सभासद संदीप दीक्षित, "काय काळोख आहे इथे!" अशी तक्रार करताना दिसले. वार्ताहरांनी टाचा उंचावून त्यांच्या ग्लासात नक्की काय आहे ते पाहण्याचा एक प्रयत्न केला. शाळेचे सभागृह असल्यामुळे मद्यपानास बंदी होती, त्यामुळे तीही शंका दूर झाली.

सभागृहात कार्यक्रम सुरू करण्याची घोषणा झाली. स्टेजवर आता तीन महिला आणि तीन पुरुष यांचे आगमन झाले आणि संवादास सुरुवात झाली. या सर्व नट–नट्यांचे उत्कृष्ट पाठांतर झाले होते. एकंदर निवडणुकीचा प्रसंग होता. धडाधड आपापली वाक्ये म्हणून हे नट आणि नट्या हावभाव करत होते. मधेमधे लांबलचक स्वगत चालले होते. ज्योतीचे वार्ताहर त्यांच्या अभिनयावर भलतेच खूष होऊन टाळ्यांवर टाळ्या मारताना दिसले. शेवटी त्यांच्या पुढच्या रांगेतल्या गृहस्थाने वार्ताहरांना गप्पा केले, " जरा गप्प बसता का? मंडळाची मीटींग चालली आहे....कळत नाही?" पाऊण–एक तासात मंडळाची मीटींग संपली आणि दिवाळी जेवणाची घोषणा केली गेली. सभागृहाच्या वरच्या मजल्यावर मंडळाने जेवणाची सोय केली होती. जमलेल्या सर्वांनी जेवणावर यथेच्छ ताव मारला आणि दिवाळी सण आनंदात साजरा केला. संदीपरावांची तक्रार तिथेही चालूच "रसमलाई काळपट का दिसते....करपली की काय?"

जेवणानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात तन्मयी दीक्षितांच्या "मोगरा फुलला" या गाण्याने झाली. पुढच्या तीन रांगा पहाता पहाता भरुन गेल्या. कार्यक्रमात भाग घेणाऱ्यांचे फोटो आणि चलतचित्रण करण्यासाठी ही मंडळी सर्वात पुढच्या खुर्च्या अडवून बसली होती असे वार्ताहरांना कळले. चैताली नाडकर्णींनी बसवलेला मुलींचा "रंगिला" चित्रपटातला लयबद्ध नाच, लहान मुलींचा "नाच रे मोरा" नाच, लिमये–कन्यांनी केलेला सुरेख "शाळा सुटली, पाटी फुटली" या गाण्यावरचा नाच, आणि पूजा मुडेने सुरेल आवाजात गायलेली गाणी....एकामागून एक कार्यक्रम रंगत होते आणि प्रेक्षकही त्यांना साथ देत होते. "वडील–कन्या" यामधला वाद गाण्यात म्हणून संदीप दीक्षितांनी टाळ्या घेतल्या. गाण्यानंतर डोळ्यांवरचा गॉगल काढला आणि आधीच्या तक्रारींचे गूढ त्यांना तेंव्हा उमजले. संध्याकाळी सहा पासून ते गॉगल घालूनच फिरत असल्याची वार्ताहरांची नोंद आहे. मंडळाच्या काही महिलांनी मंगळागौरीचा तिसरा प्रयोग करून दाखवला. कुमारी पै यांनी आपल्या कविता वाचून दिवाळी सणाच्या आनंदात भर घातली. कार्यक्रमाचा शेवट "भारतातल्या वेषभूषा" दाखवत केला गेला. त्यानंतर मंडळाने बक्षीस–समारंभ साजरा केला. वर्षभर झालेल्या विविध स्पर्धांमधील विजेत्यांचा सत्कार केला गेला.

आपण आलात, छोट्या–मोठया कलाकारांना प्रोत्साहन दिले आणि दिवाळी सणाची मजा लुटली याबद्दल मंडळ आपले अत्यंत आभारी आहे. बर तर मग! मंडळाच्या पुढच्या कार्यक्रमाला भेटूच. मंडळ वाट पाहत आहेच तुमची.

## Caterers Wanted

Northeast Ohio Marathi Mandal has a get-together usually every 8-10 weeks. Our functions involve serving snacks and/or dinner to a group of people anywhere from 50 to 150. If you wish to provide catering at our functions, please contact our President Chetan Amin or Treasurer Samir Despande with information about your estimate for food items. We might be able to utilize your services upon mutual agreement.

## Help Us Serve You Better

Feedback and Suggestions are always welcome. Please provide your feedback to any of the committee members. You may mail it, email it, or hand it over to us at the next function. You can also do so at our website under the Contact section.

http://www.neomm.org

## New Member Announcement

This section will be utilized to announce the names of new members joining the Mandal. We would also like to announce new additions to your families. Since they are also new members to the Mandal. Please send in your family additions to any member of NEOMM. Only names no address or phone numbers to be printed.

## It's Time to Renew Your Support

NEOMM is YOUR Mandal and counts on YOU to make this community a vibrant and prosperous community. Help us help you all. Help us work for you. Your timely renewal of your annual membership will help us in planning the events for the year. You can also help us all by introducing your friends to NEOMM. The individual membership for the year 2003 is $15 while family membership can be availed at $35. Bring your checks at the next function or send your checks by mail to

Drawn in favor of "NEOMM"
Chetan Amin
1071 Cliffview Dr
Eastlake, OH 44095

**Introducing the "*NEOMM Fast Access Pass*" …**

The Executive Committee of NEOMM has adopted a new fast entry pass. The "***NEOMM Fast Access Pass***" will give you a quick and cashless access to the major events of year 2003. This pass will zip you right in to the specified events without having to worry about paying the entry fee in cash at every event. To make this offer more attractive, the pass is available for only $25.00 for families and $15.00 for individuals. The family pass is a saving of 50% over the **estimated cost** for a family of 3 (2 adults and 1 kid).

Please contact any member of the Executive Committee for details or make payment arrangements. You can also bring your payment to the *Makar-Sankrant* program.

The events for which this pass is valid are listed below.

1. *Makar-Sankrant*
2. Holi
3. Picnic
4. Narali Paurnima
5. Ganesh Utsav
6. Diwali

The *NEOMM Fast Access Pass* will not be accepted for Special Events and events that are ***not*** in the list above


# Introducing… Authentic Marathi Snacks

**Gool Poli**



*Order Now !*

Prashant & Vrinda Gadgil
(512)-248-1524
prashantgadgil@yahoo.com

Family or Party Orders
Shipped Anywhere in U.S.
Available Any Time of the Year



Marathi Taste
Best Quality
Best Customer Service



**Gool Poli**
**Bhajani Chakli**
**Rava Coconut Ladoo**
**Chivda with Goodies**



**"… The "faraal" was a huge success. Everyone loved the food and we had very little leftovers. In fact, a lot of people wanted to know who catered it and we gave them your flyers. … "**
**-- A Maharashtra Mandal in US, Diwali Function, Nov 2002**

**NORTHEAST OHIO MARATHI MANDAL BUDGET & ACCOUNTS FOR 2002** 12/31/02

**Submitted by Parag Kanvinde, Treasurer, 2002**

**REVENUE**

| **Item** | | | **Budgeted** | **Year-to-date** |
|---|---|---|---|---|
| Membership (2003) to be Collected at Diwali 2002 (~70+35 life) | | | $ 2,450.00 | $ 1,080.00 |
| Membership (2002) balance collected | | | $ 1,000.00 | $ 1,865.00 |
| Life Memberships collected | | | | $ 300.00 |
| Prposed dues from trustees for life members $25 ea (~35) | | | $ 875.00 | $ - |
| Other ticket sales during events | | | $ 1,500.00 | $ 3,616.76 |
| Advertisements for Jyoti | | | $ 1,000.00 | $ 1,105.00 |
| Previous balance as of 1/1/02 | | | $ 7,495.69 | $ 7,495.69 |
| | | **Sub-Total** | **$ 14,320.69** | **$ 15,462.45** |
| Interest from Charterone Checking | | | $ 125.00 | $ 76.25 |
| Effective December 31, 2002 | | **Grand-Total** | **$ 14,445.69** | **$ 15,538.70** |

**EXPENDITURE**

| **Item** | | | | **Budgeted** | **Year-to-date** |
|---|---|---|---|---|---|
| Funds to be distributed by previous exec.comm. | | | | $ 16.20 | $ 9.70 |
| Jyoti Publications | | | | $ 1,500.00 | $ 1,633.35 |
| Life Membership dues (2) transferred to Trustees | | | | $ 600.00 | $ 600.00 |
| Charterone Bank Fees and Service Charge | | | | $ - | $ 88.00 |
| Rent to Venues for Events | | | | $ 1,250.00 | $ 1,660.12 |
| Stationary and Paper Products for Events | | | | $ - | $ 125.90 |
| Karaoke System for Events | | | | $ - | $ 160.49 |
| Events | | Rent paid | $ 1,660.12 | | |
| | 1/19/02 | MakarSankranti | $ 200.00 | $ 250.00 | $ 50.50 |
| | 2/24/02 | Movie | $ - | $ 1,000.00 | $ 527.78 |
| | 3/30/02 | Holipaurnima | $ 125.00 | $ 250.00 | $ 356.13 |
| | 5/4/02 | Maharashtra Day | $ 100.00 | $ 500.00 | $ 78.98 |
| | 6/8/02 | Picnic 1 | $ 100.00 | $ 300.00 | $ 103.02 |
| | 7/20/02 | Picnic 2 | $ 100.00 | $ 300.00 | $ 90.99 |
| | 7/27/02 | Naralipaurnima | | $ 250.00 | $ 74.53 |
| | 8/24/02 | Ventriloquist Program | $ 125.00 | $ - | $ 595.37 |
| | 9/21/02 | Ganeshotsav | $ 250.00 | $ 1,500.00 | $ 1,214.91 |
| | 10/19/02 | Kojagiri Paurnima | $ 120.00 | $ 250.00 | $ 189.98 |
| | 11/9/02 | Diwali | $ 540.12 | $ 2,500.00 | $ 3,029.59 |
| Direct Charitable Donations | | | | $ 500.00 | $ - |
| Effective December 31, 2002 | | | **Sub-Total** | **$ 10,966.20** | **$ 10,589.34** |
| Future balance (as of 12/31/02) | | | | $ 3,479.49 | $ 4,949.36 |
| Effective December 31, 2002 | | | **Grand Total** | **$ 14,445.69** | **$ 15,538.70** |

If undelivered, please return to:

Chetan Amin
1071 Cliffview Drive
Eastlake, OH 44095